**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

दिनांक १३/०३/२०२५ (गुरूवार) सकाळ

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ३० लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## उपविभागिय पोलीस अधिकारी , कन्हान यांची कामगिरी

दिनांक १२/०३/२०२५ रोजी श्री संतोष गायकवाड, उप विभागीय पोलीस अधीकारी ,कन्हान हे मौदा पोलीस स्टेशन येथे जात असतांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की वाहन क्रंमाक एम एच ३१ एफ. सी ९२४५ या टिप्पने अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे श्री संतोष गायकवाड, उप विभागीय पोलीस अधीकारी ,कन्हान यांच्या पथकाने मथनी टोल नाका येथे नाकाबंदी केली असता एम. एच. ३१ एफ. सी ९२४५ हे संशयीत टिप्पर दिसुन आले. पोलीसांनी टिप्पर चालकास वाहन थांबविण्याचा इशार केला असता वाहन चालकाने वाहन न थांबविता नागपुर च्या दिशेन पळ काढला. पोलीसांनी शिताफिने सदर वाहन क्रमांक एम एच ३१ एफ. सी ९२४५ याला भंडारा नागपुर हायवे वर मथनी शिवारात कोठारी फार्म चे समोर पकडले. **वाहनास** थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये रेती मिळून आली. वाहन चालक **आरोपी क्र १ नामे जगदीश सुरेश मानकर , वय २४ वर्षे, रा. मालीपार, ता. जि. भंडारा आणि आरोपी क्र २. क्लिनर धिरज विनोद मेश्राम, वय २१ वर्षे रा. इंजेवाडा , ता. जि. भंडारा असे मिळुन आले. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. मालकाचे नाव विचारले असता आरोप क्र ३. मालक प्रविण गोपलराव खवसे रा.सुरेंद्रगड, सेमीनरी हिल,नागपुर याच्या सांगण्यावरून अवैध रित्या रेतीची वाहतुक करीत असल्याची** माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन

१) १० ब्रास रेती किंमती ५०,००० /— रूपये आणि २) टिप्पर क्रमांक एम एच ३१ एफ. सी ९२४५ किंमती ३०,००,०००/— रूपये असा एकुण **३०,५०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद ३ आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,१९५७. कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम,१९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



## पहील्या साउथ एशियन मास्टर्स  ॲथेलेटिक्स ओपन चॅम्पीयनशिप २०२५ स्पर्धेत सहा.फौजदार सिमा अख्तर यांना  ४०० मिटर हर्डल्स मध्ये तिसरे स्थान

१० जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ रोजी पहीली साउथ एशियन मास्टर्स ॲथेलेटिक्स ओपन चॅम्पीयनशिप २०२५ मंगला स्टेडीयम ,मॅंगलोर ,कर्नाटक राज्य येथे आयोजित करण्यात आलेली होती. नागपुर ग्रामीण जिल्हयात नेमणुकीस असलेल्या **सहा.फौजदार  सिमा अख्तर नेम पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा** यांनी सदर स्पर्धेत भाग घेवुन  **४०० मिटर हर्डल्स** मध्ये **तिसरे स्थान** पटकावले आहे. यापुर्वी सहा.फौजदार  सिमा अख्तर यांनी  ऑक्टोबर २०२४ मध्ये नागपुर येथे आयोजित महाराष्ट्र मास्टर्स ॲथेलेटिक्स असोशिएशन या स्पर्धेत **८०० मीटर धावणे** या मध्ये **पहीले स्थान** पटकावले होते. त्यांच्या या कामगिरीचे मा. श्री हर्ष ए. पोद्‌दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी कौतुक करून त्यांना सन्मानित केले.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर